# साईबाबा के दरबार मे आओ मिलकर खुशिया मनाये...सर्वधर्म समभावाचा संदेश देणारे शिर्डी के साईबाबा महानाट्याने श्रोते मंत्रमुग्ध



नागपूर.'कौन किसे कहां ढूंढता है कोई दौडता है कोई भागता है' अशा सारगर्भित संवादांनी भारलेल्या शिर्डी के साईबाबा या महानाट्याचे सादरीकरण नागपूर महानगरपलिका क्रिडा व सांस्कृतिक विभागातर्फे रविवार (ता.१३) रोजी नंदनवन दर्शन कॉलनी येथील भव्य मैदानात करण्यात आले. संस्कार मल्टी सर्व्हिसेस प्रस्तुत आसावरी तिडके निर्मित या महानाट्याला साई प्रेमी भक्तांची भरगच्च उपस्थिती लाभली.

प्रसंगी प्रामुख्याने आमदार कृष्णा खोपडेए महापौर प्रविण दटकेए स्थायी समिती सभापती सुधीर (बंडू) राऊत यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचा प्रारंभ अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रफुल्ल फरकासेए नागपूर महानगरपालिका सांस्कृतिक समितीचे सभापती व नेहर नगर झोनचे हरिष दिकोंडवारए नगरसेविका दिव्या धुरडेए नगरसेविका मनिषा कोठेए नगरसेवक प्रविण नरडए नगरसेविका व महिला आघाडी शहरमंत्री अर्चना गडेकर आदी मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन झाले.

सुरवातीला मंचाचे व नटराज पूजन प्रफुल्ल फरकासे व इतर मान्यवरांच्या हस्ते पार पडले. महानाट्याची सुरवात गणेशवंदनेने झाली.'जय श्री गणनायका' गीतावर नृत्य कलावंतांनी गणेशाला मानवंदना अपर्ण केली. यानंतर देवीचा जागर सादर करुन उपस्थितांना मंत्र मुग्ध केले. महानाट्यात साई बाबांच्या अनेक चमत्कारांचे प्रस्तुतीकरण सादर झाले. चांद नावाच्या घोडीवाल्याला त्याची हरवलेली 'बिजली' ही घोडी साईबाबा क्षणात शोधून देतात आणि 'कौन किसे कहां ढूंढता है' अशा शब्दात परमेश्वराचा वास नेमका कुठे असतो सुचित करतात. 'आई रे आई दिपावली आओ बाबा के दरबार मे' 'मिलकर खुशियां मनाये..' या गीतावर कलावंतांचे नृत्य हे साईप्रतिच्या समर्पणभावाने फुलले.

महानाट्यात घोडीचा शोधए दहीहांडी इत्यादीचे अनेक प्रसंग उपस्थितांची दाद घेऊन गेले. अनेक प्रसंगांनी साईभक्तांच्या डोळे ही पाणावले. नाटकाची निर्मिती आसावरी तिडके यांची होती. लेखक व दिग्दर्शक डॉ. नरेश गडेकरए सहदिग्दर्शन प्रकाश पात्रीकरए प्रकाश योजना विशाल यादवए संगीत योजना 'मोरेश्वर निस्तानेए पाश्र्व संगीत' शैलेश दाणीए

नेपथय सुनील हमदापुरे व नाना मिसाळ यांचे होते. महानाट्यात साईबाबांची 'मुख्य भूमिका सुप्रसिद्ध नाट्कार व चित्रपट कलावंत प्रकाश लुंगे' यांनी समररसुन सादर करुन श्रोत्यांची दाद मिळवली. गावकरीए भक्तगणए बालकलावतांच्या भूष्मिकांनी श्रोत्यांची पसंती लाभली.

**(चौकट)**

याशिवाय महानाट्यात विनोद राऊतए मुकुंद वसुलेए राहूल ङ्कडणवीसए मिना देशपांडेएरोशन नंदवंशीए प्रशांत मंगदेए हेमंत मुढाणकरए सुधीर पाटीलए प्रसाद ढाकूलकरए रुपेश सगए अनिल कळमकरए शक्ती रतनए विश्वास अभ्यंकरए मोहन काळबांडेए नितीन पात्रीकरए अदित्य ईटनकरए जयंत पाध्येएराजेश शेरकीए किर्ती मानेगावंकरए रुपराव कामडीए मंजुषा बोंदरेए बलवंत येरपुढेए मुग्धा देशकरए मोहन पात्रीकरए डॉ. अनंत मुळेए सुजाता शिंदेए विनोद गाजर्लवारए माला भुरेए विजय नरुलेए प्रवीण देशकरए राजा वेगीए करिष्मा भोरखडेए रविंद्र भुसारीए निशांत अनथेसे आदी कलांवतांनी विविध भूमिका साकारल्या.

# P.C.P.N.D.T कायदयाचे पालन न करणाऱ्या सोनोग्राफी सेंटर वर कडक कार्यवाही करण्यात येईल.




P.C.P.N.D.T सल्लागार समितीची सभा संपन्न. गर्भधारणापूर्व व प्रसव पूर्व लिंग निदान निवडीस प्रतिबंध 2003 कायदयाची परिणामकारक अमलबजावणी करण्याचे दृष्टीने तसेच सोनोग्राफी केन्द्रांना रजिस्ट्रेशन व नूतनीकरण देण्याकरीता जिल्हा पी.सी.एन.डी.टी. सल्लागार समितीचे सभा म.न.पा.च्या धरमपेठ स्थित डीक दवाखाना व्ही.आय.पी. रोड येथे नोडल अधिकारी डॉ. भावना सोनकुसरे यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या सभेत समितीचे सदस्य इंडीयन मेडीकल असोशिएशनच्या सदस्या डॉ. वर्षा ढवळे, प्रसिध्दी स्त्री रोगतज्ञ डॉ. चैतन्य शेंबेकर, समितीचे सदस्य प्रसिद्ध रेडीओलॉजिस्ट डॉ.प्रशांत ओंकार, म.न.पा.चे जनसंपर्क अधिकारी व समितीचे सदस्य श्री.अशोक कोल्हटकर, स्वयंसेवी संस्थेच्या श्रीमती विना खानोरकर, कायदयाचे सल्लागार ॲड. सुरेखा बोरकूटे, डॉ. वासंती देशपांडे आदी सदस्य आवर्जून उपस्थित होते.

ही सभा म.न.पा.तील पी.सी.पी.एन.डी.टी. कायदया अंतर्गत सभा दर दोन महिन्यानी घेण्यात येते व नागपूर शहरातील सोनोग्राफी सेंटरची नियमितपणे आढावा घेत असते. सोनोग्राफी सेंटर, आय.व्ही.एफ किंवा कोणतीही इमॅजिन सेंटर सुरू करावयाचे असल्यास सर्वप्रथम म.न.पा.आरोग्य विभागाची परवानगी असने बंधनकारक आहे. पी.सी.पी.एन.डी.टी. अंतर्गत बीसकॅन मशीन रजिस्टर्ड करू घ्यावी अन्यथा प्रशासकीय कार्यवाही होणार. सोनोग्राफी मशीन पूर्व परवानगी शिवाय कुठेही हलविता येत नाही. ती फक्त म.न.पा. मध्ये रजिस्टर असलेल्या ठिकाणीच हलविता येते. याबैठकीत एका सोनोग्राफी सेंटरनी पी.सी.पी.एन.डी.टी. समिती व म.न.पा.ची परवानगी न घेता नोंदणी नसलेल्या जागेवर हलविण्यात आल्याबद्दल त्यांचेवर नोटीस देऊन प्रशासकीय कार्यवाही करण्यात येणार आहे.

या सभेत नव्याने शासनाच्या निर्देशाप्रमाणे रेडीओलॉजीस्ट सोसायटीचे प्रतिनीधी म्हणून डॉ. प्रशांत ओंकार यांना घेण्यात आले. शासनातर्फे मॉडेल - फार्म उपलब्ध झाला आहे. तो सर्व रेडीओलॉजीस्ट व सर्व सोनोग्राफी सेंटरची लवकरच कार्यशाळा घेऊन त्यांचे वितरण करण्यात येणार आहे. त्यापूर्वी सर्व ठिकाणी समानाता सुसुत्रिकरण आढळून येईल. त्यांचे सर्व डॉक्यूमेंट व्यवस्थीत होईल व प्रक्रीया ऑनलाईन असल्यामुळे गैरप्रकार होणार नाही. आतापावेतो 4 बीस कॅन मशीन असलेल्या डॉक्टराचा पी.सी.पी.एन.डी.टी. कायदयाच्या अंतर्गत नोंदणी झालेला आहे इतराकडे सुद्धा बीसकॅन मशीन आहे

त्यानी त्वरीत म.न.पा.त नोंदणी करून घ्यावे अन्यथा प्रशासन कार्यवाही करेल असेही बैठकीत निर्णय घेण्यात आला.

नागपूर म.न.पा.च्या हद्दीत सध्या 530 सोनोग्राफी सेंटर नोंदणीकृत आहेत. त्यातील 334 सुरू आहेत 186 सेंटर काही कारणास्तव बंद आहेत. यासर्व सेंटरला सूचना देण्यात आली आहे. ज्याही सेंटरवर गरोदर स्त्रीयांची सोनोग्राफी होते त्यांना ऑनलाईन - फार्म भरणे बंधनकारक आहे. सद्या नागपूरचा सेक्स रेषो चांगला आहे आणि सगळीकडे नियमाची काटेकोरपणे पालन होत आहे. जे नियमाचा पालन करीत नाही त्यांच्यावर पी.सी.पी.एन.डी.टी. कायदयानुसार लवरकच कार्यवाही करण्यात येणार आहे.

ज्या टेस्ट टयुब बेबी सेंटरवर प्रसुती होते त्यांना दर महिण्याला मुलगा व मुलींच्या जन्माचा सेक्स रेषो पी.सी.पी.एन.डी.टी. विभागाला कळविणे गरजेचे आहे. तसेच या बैठकीत नवीन 9 सोनोग्राफी सेंटरला मंजूरी प्रदान करण्यात आली व 5 सोनोग्राफी सेंटरचे नुतनीकरणास मंजूरी प्रदान करण्यात आली.